*A picture that moved me, and got me into tears.*
*My Tribute to Nepal Earthquake victims*

## वासरं

पायामध्ये नाही बळ, तोच जमीन हालली
बीज रुजलेच नाही,  कशी फुटेल पालवी    !!१!!
नाती-गोती सारी माती, आता कोणी न उरले
डोळ्यातील आंसू , डोळ्यांमधेच सुकले   !!२!!

जगण्याच्या झाल्या चिंध्या, खेळ चिंध्यांची बाहुली
तुझ्या माझ्या दु:खाला, हिमालयाची सावली   !!३!!
बाबा दिसे ना ग कुठे, हाक आईची ना कानी
आई -बाबांची भातुकली सारी धुळीस मिळाली   !!४!!

चिमुकले जीव आम्ही, जीव होतो रे घाबरा
चिमुकल्या मिठीमध्ये आता जन्माचा आसरा !!५!! -

- देवा नको असा खेळ, सारा हालतो पसारा
हंबरणे उरे कानी , गाय नसे रे वासरा !!६!!

- डॉ . अमित त्रिभुवन, पुणे

